राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सक्षमता आणण्यासाठी उपपदार्थावर प्रक्रिया प्रकल्प बीओटी (Built Operate Transfer) / बीओओटी (Built Own Operate Transfer) तत्वावर उभारण्यासाठी निकष निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्र. ससाका ०६२५/प्र.क्र.११४/३ स**
रुम. नं ६२०, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि. २६ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ** - १) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. शासन शुध्दीपत्रक क्रमांक:ससाका-२०१९/प्र.क्र.१०५/३-स दि. ०८/०९/२०२०.
२) शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. ससाका-२०१९/प्र.क्र.१०५/३-स दि.०९.०४.२०२५
३) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. साआ/उपप/कक्ष-९/७२३/२०२५ दि.१३.११.२०२५
४) सहकार. पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन पत्र क्र. ससाका ०६२५/प्र क्र ११४/३ स, दि. २६.०२.२०२६

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य हे देशातील अग्रगण्य साखर उत्पादक राज्य असून, भारताच्या एकूण साखर उत्पादनातील बहुमूल्य वाटा हा महाराष्ट्र राज्याचा आहे. सहकार क्षेत्रातील साखर उद्योग हा ग्रामीण भागाचा सामाजिक आणि आर्थिक विकासाचा कणा आहे. राज्यातील साखर उद्योगाने गेल्या काही दशकांपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसह ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासात मोलाची भूमिका बजावलेली आहे.

सहकार क्षेत्र हे महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक मुख्य घटक आहे. राज्यातील साखर उद्योगाचा पाया सहकारी चळवळीवर आधारित असून या चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी संघटित पध्दतीने उद्योग उभारलेले आहेत. या साखर उद्योगामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, सामाजिक सुविधा, शिक्षण, आरोग्य व पायाभूत विकासास मोठी चालना मिळालेली आहे. साखर कारखाने केवळ साखर उत्पादनापुरते मर्यादित न राहता त्यातून बगॅस, मळी, प्रेसमड ही उपउत्पादने उत्पादित केली जातात. या उपपदार्थापासून पुढे साखर कारखाने सहवीज निर्मिती, आसवणी, इथेनॉल, बायोगॅस, देशी आणि विदेशी दारू, मिनरल वॉटर, सॅनिटायझर, ऑक्सिजन प्रकल्प, कॉर्बन डायऑक्साइड प्रकल्प, पार्टीकल बोर्ड / पेपर उत्पादन प्रकल्प, बायोप्लास्टीक, स्पेंट वॉश, सॉईल कंडिशनर, ऑरगॅनिक केमिकल, जैविक प्रेरके / संप्रेरके, सौरउर्जा इ. प्रकल्प उभारले जातात.

तसेच आताच्या भारत सरकार यांच्या नवीन धोरणानुसार कॉम्प्रेसड बायोगॅस (CBG) हायड्रोजन, Sustainable Aviation Fuel, Active Pharma Ingredient इ. नवीन उपउत्पादने तयार करण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील साखर कारखाने सक्षम आहेत. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी उपपदार्थ उत्पादन करण्यासाठी प्रकल्प उभारल्यास त्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते आणि पर्यायाने त्याचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होईल. हे प्रकल्प उभारल्यामुळे साखर कारखान्याच्या आर्थिक सक्षमतेमध्ये वाढ होऊन रोजगार निर्मिती व मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन कारखान्याच्या विकासाला चालना मिळेल.

सद्यपरिस्थितीला महाराष्ट्र राज्यातील काही साखर कारखान्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने साखर कारखान्यांना, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाचा हमीभाव देताना अडचणी येतात. खराब आर्थिक परिस्थिती, उणे नक्त मूल्य आणि कर्ज उभारण्याची मर्यादा समाप्त झाल्यामुळे साखर कारखान्यांना उपपदार्थ उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी वित्तीय संस्था कर्ज उपलब्ध करून देत नाहीत. निधी अभावी साखर कारखान्यांना उपपदार्थ उत्पादन प्रकल्प उभारण्यास अडचणी येतात

वरील सर्व बाबींचा विचार केला असता, सहकारी साखर कारखान्यांनी उपपदार्थ उत्पादन प्रकल्प उभारण्याकरिता खाजगी भांडवलदाराकडून गुंतवणूक करून BOOT तत्वावर करार करणे आवश्यक आहे. यामुळे साखर कारखान्यांवर कोणताही आर्थिक भार न पडता त्यांना सदर प्रकल्पातून उत्पन्न निर्माण होईल. सदर बाबतीत धोरण जाहीर करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यामुळे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सक्षमता आणण्यासाठी, उपपदार्थावर प्रक्रिया प्रकल्प बीओटी (Built Operate Transfer) / बीओओटी (Built Own Operate Transfer) तत्वावर उभारण्यासाठी निकष आणि कार्यपध्दती निश्चित करुन सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना उपपदार्थ उत्पादन प्रकल्प उभारण्याकरिता त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सक्षमता आणण्यासाठी, उपपदार्थावर प्रक्रिया प्रकल्प बीओटी (Built Operate Transfer) / बीओओटी (Built Own Operate Transfer) तत्वावर उभारण्यासाठी पुढीलप्रमाणे निकष आणि कार्यपध्दती निश्चित करुन सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१.** बीओटी (Built Operate Transfer) / बीओओटी (Built Own Operate Transfer) पध्दतीचे स्वरूप:-

BOT म्हणजे Built Operate Transfer आणि BOOT म्हणजे Built - Own - Operate - Transfer म्हणजेच, खाजगी गुंतवणूकदाराने ठराविक कालावधीसाठी प्रकल्प उभारणे, मालकी राखणे, संचालन करणे आणि नंतर साखर कारखान्याकडे हस्तांतरित करणे.

१ Built (उभारणी): गुंतवणूकदार / विकासक स्वतःच्या भांडवलातून युनिट उभारेल.

२ Own (मालकी) : गुंतवणूकदार / विकासक ठराविक कालावधीकरिता (५-१० वर्षे) तो प्रकल्पाची मालकी राखू शकतो.

३ Operate (संचालन): गुंतवणूकदार / विकासक ठरलेल्या कालावधीत उत्पादन व देखभाल करेल आणि मिळणाऱ्या नफ्यातून साखर कारखान्यांना ठरल्याप्रमाणे देय रक्कम अदा करेल.

४ Transfer (हस्तांतरण): ठरलेल्या कालावधीअंती प्रकल्प साखर कारखान्याकडे हस्तांतरित केला जाईल.

**२. प्रकल्पाचे उद्दिष्टे :-**

महाराष्ट्र राज्यातील आर्थिकदृष्ट्या आजारी असणाऱ्या साखर कारखान्यांना संजीवनी देण्याकरिता BOT/BOOT तत्वावर उभारण्यात येणाऱ्या उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे-

i. उपपदार्थ उत्पादन प्रकल्पातून साखर कारखान्याला अधिकचे उत्पन्न हे जागेचे भाडे, कच्च्या मालाची किंमत यातून मिळून साखर कारखान्यांची आर्थिक परिस्थिती भक्कम करणे.
ii. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात नवीन रोजगार व उद्योजकतेची संधी निर्माण करणे.
iii. साखर कारखान्यांच्या तांत्रिक आणि पर्यावरणपूरक आधुनिकीकरणास चालना देणे.
iv. खाजगी व सहकारी क्षेत्रामध्ये पारदर्शक भागीदारी निर्माण करणे.

**३. प्रकल्पाचे कार्यक्षेत्र आणि व्याप्ती :-**

वरील धोरण हे BOT /BOOT तत्वावर उपउत्पादन प्रकल्प उभारू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या उपपदार्थ उत्पादन प्रकल्पांना लागू असेल.

**४. आजारी सहकारी साखर कारखाना पात्रता निकष :-**

आर्थिकदृष्ट्या आजारी असलेले सहकारी साखर कारखान्यांच्या पात्रतेसाठी निकष खालील प्रमाणे आहेत.

i. मागील सलग ३ आर्थिक वर्षे संचित तोटा असणे.
ii. मागील सलग ३ आर्थिक वर्षे उणे नक्त मूल्य असणे.
iii. बाहेरील कर्ज उभारणी मर्यादा संपुष्टात आलेली असणे.
iv. मागील सलग ३ आर्थिक वर्षे लेखापरिक्षण वर्ग क किंवा ड असणे.
v. गत तीन हंगामात क्षमतेपेक्षा ५०% पेक्षा कमी गाळप झाले असणे.
vi. शासकीय अर्थसहाय्याची थकबाकी असणे.

वरीलपैकी कोणताही एक निकष पूर्ण झाल्यास सदर कारखाना BOT/BOOT तत्वावर उपपदार्थावरील प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी पात्र राहील. त्यामुळे वरील अडचणींवर मात करण्यासाठी साखर कारखान्यांना BOT (Built Operate Transfer), BOOT (Built Own Operate Transfer) या तत्वावर उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाची उभारणी करता येईल. तसेच हे उभारलेले प्रकल्प कालांतराने साखर कारखान्यांना आर्थिक सक्षमता निर्माण झाल्यानंतर स्वतःच्या मालकीने खरेदी करता येतील.

**५. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांकरिता :-**

महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांना BOT/BOOT तत्त्वावर उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाची उभारणी करावयाची असल्यास सदर धोरणातील अटी व शर्ती त्यांनाही लागू होतील.

**६. <u>प्रकल्पाकरिता विकासक निवड प्रक्रिया :-</u>**

**६.१** BOT/BOOT तत्वावर कोणत्या उपपदार्थापासून प्रक्रिया प्रकल्प उभा करावयाचा यासाठी सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाच्या सभेत ठराव पारित करणे बंधनकारक राहील.

**६.२** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २० (अ) नुसार सहकारी साखर कारखान्यांनी खाजगी गुंतवणूकदाराबरोबर सहयोग करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीसाठी साखर कारखान्यांनी साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन / अर्ज सादर करणे गरजेचे आहे. खाजगी गुंतवणूकदारासोबत साखर कारखान्यांनी करार करताना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २० (अ) चे काटेकोरपणे पालन करावे.

**६.३** सहकारी साखर कारखान्यांनी साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २० (अ) नुसार पूर्वपरवानगी घेण्याकरिता खालील कागदपत्रे सादर करावे.

i) सहकारी साखर कारखान्यांना BOT/BOOT तत्वावर उपपदार्थ उत्पादन प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन / अर्ज.

ii) सहकारी साखर कारखाना हा आजारी साखर कारखान्याच्या पात्रता निकषात बसत असेल तर, त्याबद्दल सनदी लेखापाल यांच्याकडील प्रमाणपत्र.

iii) सहकारी साखर कारखान्यांनी BOT/BOOT तत्वावर उपपदार्थ उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठीचा संचालक मंडळाच्या बैठकीत पारित केलेला ठराव.

iv) सहकारी साखर कारखान्याकडे सध्या उपलब्ध असलेल्या जमिनीचा तपशील (क्षेत्र, स्थान / ठिकाण, रेखांश, अक्षांश)

v) सहकारी साखर कारखान्याचा मागील ३ वर्षाचे उत्पन्न व खर्च पत्रक, ताळेबंद पत्रक, आयकर विवरण पत्रक.

vi) सहकारी साखर कारखान्यांचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल.

vii) लेखा परिक्षणामध्ये आर्थिक बाबी संदर्भात गंभीर दोष असल्यास त्याचा तपशील.

**६.४** साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम २० (अ) नुसार पूर्वपरवानगी घेण्याकरिता त्यांचे शिफारशीसह शासनास प्रस्ताव सादर करावा.

**६.५** सदर उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाकरिता साखर कारखान्यांनी शासनाची / साखर आयुक्तालयाची मान्यता न घेता सांमजस्य करार (MoU) करून BOT/BOOT तत्वावर प्रकल्प सुरू करण्यात येऊ नये अन्यथा त्याचे होणारे आर्थिक नुकसान आणि महाराष्ट्र राज्य अधिनियम १९६० चे उल्लंघन याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ आणि कार्यकारी संचालक यांची राहील.

**६.६** साखर कारखान्याने उपपदार्थ उत्पादन प्रकल्प BOT/BOOT तत्वावर देण्यापूर्वी प्रारूप आराखड्यामध्ये शासन मान्य संस्थेकडून DPR (Detailed Project Report) तयार करून घेणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्प उभारणीचा खर्च, Operational Cost, Pay-back period, Internal

Rate of Return (IRR) विचारात घेवून BOT/BOOT प्रकल्पाचा कालावधी शासन मान्य तज्ञ संस्थेकडून ठरविण्यात यावा.

**६.७** DPR तयार केल्यानंतर प्रकल्प कारखान्याच्या दृष्टीने फायदेशीर असल्याबाबतची आर्थिक व तांत्रिक मंजूरी साखर आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत करून घेण्यात यावी. साखर आयुक्त यांचेकडून आर्थिक व तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर त्या अनुषंगाने देशपातळीवर आणि राज्यपातळीवर प्रत्येकी किमान एका दैनिकामध्ये जाहिरात देवून अभिरूचीची अभिव्यक्ती (Expression of Interest - EOI) चे प्रस्ताव मागविण्यात यावेत.

**६.८** उपपदार्थ उत्पादन करणाऱ्या प्रकल्पामध्ये गुंतवणूकदाराने संबंधित साखर कारखान्याकडे अभिरूचीची अभिव्यक्ती (Expression of Interest - EOI) प्रस्ताव सादर करावा. सदर प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये खालील तपशील नमूद करावा.

| अनु क्र. | तपशील |
|---|---|
| १ | गुंतवणूक करणाऱ्या खाजगी भागीदार, प्रवर्तक / संचालक यांची माहिती |
| २ | विकासक कंपनीची माहिती |
| ३ | कंपनीच्या व्यवस्थापनाबद्दल माहिती |
| ४ | साखर उद्योग धंद्यात प्रकल्प उभारणी / चालविणेचे काम केल्याबद्दलची माहिती |
| ५ | गुंतवणूक करणाऱ्या विकासकाची आर्थिक स्थिती दर्शविणारे मागील ५ वर्षाचे पत्रके (नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, आयकर विवरण पत्रक, आर्थिक ऐपतदारी प्रमाणपत्र, गुंतवणूकीचे पत्रक इ.) |
| ६ | यापूर्वी BOT/BOOT तत्वावर भारतामध्ये कोणता प्रकल्प राबविला असेल तर त्याची माहिती सादर करावी. |

i. अभिरूचीची अभिव्यक्ती (Expression of Interest - EOI) अर्ज भरलेल्या पात्र अभिरूचीची अभिव्यक्ती (Expression of Interest) गुंतवणूकदाराची काटेकोरपणे छाननी करण्याची जबाबदारी ही सहकारी साखर कारखान्यावर राहील.

ii. पात्र गुंतवणूकदार ठरल्यानंतर त्यांच्याकडून ई-निविदेद्वारे Financial Bid / Offer घेण्यात यावी.

iii. ई-निविदामध्ये किमान प्रतिवर्षी जागेचे निश्चित भाडे, अनामत रक्कम, कराराची मुदत, कच्च्या मालाची किंमत, वीजबील इ. बाबींचा उल्लेख असणे आवश्यक राहील.

iv. ई-निविदेमध्ये पात्र गुंतवणूकदाराने दिलेल्या Financial Bid मधील सर्व विकासकांचा तुलनात्मक तक्ता तयार करून त्यामधील कारखान्याच्या दृष्टीने जो गुंतवणूकदार फायदेशीर असेल त्याची निवड सहकारी साखर कारखान्याने करावी. प्रकल्प किंमत रु.५ कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक (करांसह) असणा-या प्रकल्पांच्या प्रस्तावांना साखर आयुक्त स्तरावरील समिती अंतिम मान्यता देईल व रु. ५ कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक असणारे प्रकल्पांचे प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी साखर आयुक्तालयामार्फत शासनास सादर करावेत.

v. जागेच्या वार्षिक भाडेपोटी विकासकाने अनामत रक्कम म्हणून एक वर्षाच्या निश्चित भाड्या इतकी रक्कम कारखान्याकडे बिनव्याजी जमा करावी लागेल.

vi. प्रकल्पामध्ये गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदाराची निवड प्रक्रिया शासनाच्या निर्देशानुसार स्पर्धात्मक व पारदर्शक राहील याची संबंधित साखर कारखान्यांनी काळजी घ्यावी.

**७. पर्यवेक्षण व अहवाल :-**

प्रकल्प योग्यरित्या चालू आहे की नाही याची चाचपणी करण्यासाठी कारखान्याने योग्य ते पर्यवेक्षण करून त्याचा अहवाल शासनाला वेळोवेळी सादर करावा.

i. या प्रकल्पाच्या प्रगतीचा तिमाही अहवाल कारखान्याने शासनाला सादर करणे बंधनकारक राहील.

ii. विकासकाने प्रकल्पाचे लेखा व वित्तीय विभाग हे स्वतंत्र ठेवणे गरजेचे आहे.

iii. सदर प्रकल्पाचे लेखापरिक्षण मान्यता प्राप्त सनदी लेखापालाकडून करून घेण्यात यावे व सदरचा लेखापरिक्षण अहवाल साखर कारखाना आणि साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा.

iv. महाराष्ट्र राज्यात सुरू होणाऱ्या, BOT/BOOT तत्वावरील उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाचे संबंधित प्रादेशिक सहसंचालक साखर यांचेमार्फत पर्यवेक्षण करून सदर प्रकल्पाचा दरमहा आढावा घेण्यात यावा.

८. BOOT प्रकल्पातील वाद निवारणासाठी उपाय (Remedies):-

साखर कारखान्यात राबविण्यात येणाऱ्या BOT/BOOT प्रकल्पाच्या अंमलबजावणी दरम्यान काही वेळा विविध कारणांमुळे वाद-विवाद किंवा मतभेद निर्माण होवू शकतात असे वाद किंवा मतभेद सोडविण्यासाठी खालील उपाय प्रभावी ठरू शकतात. विकासक व साखर कारखाने यांच्यामध्ये कराराच्या अटींचे पालन न करणे आर्थिक व्यवहारातील मतभेद, तांत्रिक कारणे व कार्यक्षमता, हक्क व मालकी हस्तांतरणावरील वाद-विवाद व इतर कायदेशीर बाबींवर वाद-विवाद होवू शकतात. ते वाद निवारण्यासाठीचे उपाय खालीलप्रमाणे असतील.

i. **आपसी चर्चा:** विकासक आणि सहकारी साखर कारखान्यांमध्ये वाद उद्भवल्यानंतर सर्वप्रथम दोन्ही पक्षाने सविस्तर चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा. यामुळे वेळ, खर्च आणि न्यायालयीन प्रक्रिया टाळता येईल.

ii. **मध्यस्थी (Mediation):** जर विकासक व सहकारी साखर कारखान्यातील आपसी चर्चा निष्फळ ठरली तर तटस्थ व्यक्तीच्या माध्यमातून मध्यस्थी करून दोन्ही पक्षाला समाधनकारक उपाय मिळविता येईल. हा उपाय औपचारिक न होता व्यवहार्य आणि वेगवान असावा.

iii. **मध्यस्थ न्याय (Arbitration)**- विकासक आणि सहकारी साखर कारखान्यात होणाऱ्या करारामध्ये Arbitration चा Clause नमूद करावा. जेणेकरून वाद उद्भवल्यास तो नियुक्त मध्यस्थ न्यायाधीश (Arbitrator) यांच्यामार्फत सोडवला जावू शकेल. Arbitrator चा निर्णय दोन्ही पक्षास बंधनकारक राहील.

iv. **तांत्रिक समितीमार्फत निवारण-** विकासक आणि सहकारी साखर कारखान्यात प्रकल्पात उद्भवणारे तांत्रिक वाद उदा. उपकरणाची कार्यक्षमता, बांधकाम गुणवत्ता इ. सोडविण्यासाठी तज्ञ समितीची नेमणूक करून तिच्या शिफारसीनुसार वाद-विवादाचे निवारण करावे. सदर तांत्रिक समितीची नेमणूक साखर आयुक्त यांनी करणेबाबत करारामध्ये Clause नमूद करावा.

v. **न्यायालयीन मार्ग-** दोघांमध्ये मध्यस्थी किंवा अन्य उपाय निष्फळ ठरल्यास संबंधीत न्यायालयात दावा दाखल करून वादाचे निवारण करून घ्यावे.

९. <u>बुट प्रकल्प राबविण्याकरिताच्या अटी व शर्ती:-</u>

गुंतवणूकदाराची निवड झाल्यानंतर सहकारी साखर कारखाना व गुंतवणूकदार यांच्यामध्ये होणाऱ्या सामंजस्य करार (MoU) साठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.-

९.१. केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या तसेच स्थानिक प्राधिकरणाच्या आणि सक्षम प्राधिकरणाच्या परवानगी / मान्यता मिळवणे ही BOT/BOOT तत्वावर प्रकल्प उभारणाऱ्या विकासकाची जबाबदारी असेल. साखर कारखाना यामध्ये फक्त सहाय्यकाची भूमिका पार पाडेल.

९.२. प्रकल्पाच्या संबंधित केंद्र व राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांच्या विविध कायदे व नियमाचे पालन करण्याची जबाबदारी BOT/BOOT तत्वावर प्रकल्प उभारणाऱ्या यंत्रणेची असेल.

९.३. प्रक्रिया प्रकल्पांसाठी सहकारी साखर कारखान्यांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या कच्च्या मालाची किंमत ठरविताना कारखान्याला नफा होईल याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित सहकारी साखर कारखान्यांची राहील. त्यासाठी संबंधित जिल्हयातील साखर कारखान्यांच्या उपपदार्थ / उपउत्पादने यांचा दरवर्षी मागील तीन वर्षातील सरासरी दर विचारात घेण्यात यावा.

९.४. सदर प्रकल्पाचा विमा (सर्व मालमत्ता आणि इतर) काढण्याची जबाबदारी ही पूर्णतः विकासकाची राहील.

९.५. BOT/BOOT तत्वावरील प्रकल्प साखर कारखान्याच्या मालकीच्या जागेत उभारणार असल्यास, त्या जागेचे भाडे साखर कारखान्याला मिळेल याची दक्षता घ्यावी, भाडे ठरविताना त्या परिसरातील रेडी रेकनर दर किंवा शासन मान्य व्हॅल्यूअर कडून निश्चित केलेला प्रचलित व्यावसायिक दर यांपैकी जो जास्त असेल तो ठरविण्यात यावा.

९.६. BOT/BOOT तत्वावरील प्रकल्प राबविताना सहकारी साखर कारखान्यांनी प्रकल्पातून उत्पादित होणाऱ्या उत्पादनाचे बाजारातील तद् वर्षातील किंमत आणि पुढील कालावधीमध्ये असणारी मागणी व पुरवठ्यानुसार असणारी किंमत याचा तपशील / आराखडा सादर करावा.

९.७. सहकारी साखर कारखान्यांकडील थकित शासकीय भागभांडवल, कर्ज आणि थकहमी व थकहमी शुल्क यांच्या वसुलीबाबत सविस्तर आराखडा कारखान्यांना सादर करणे बंधनकारक राहील.

९.८. प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या उत्पादनाची मागणी, किंमत आणि BOT/BOOT तत्वावरील प्रकल्प खर्च याबाबत आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या छाननी साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत सक्षम यंत्रणेने केलेली असावी.

९.९. सहकारी साखर कारखान्यांचे मागील ३ वर्षाचे आर्थिक ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक आणि लेखा परिक्षण अहवाल साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे. जेणेकरून सदरचा कारखाना पात्रता निकषामध्ये पात्र ठरेल.

१० <u>करारातील अटी :-</u>

शासन मान्यतेनंतर सहकारी साखर कारखान्याने BOT/BOOT तत्वावरील प्रकल्प उभारणी करणाऱ्या संस्था / फर्म / कंपनी यांच्या समवेत लेखी करार करणे आवश्यक राहील, या करारामध्ये किमान खालील बाबी बाबत स्पष्ट तरतूदी करणे आवश्यक असेल.

१०.१. BOT/BOOT तत्वावरील प्रकल्पाच्या कालावधीमध्ये साखर कारखाना आणि खाजगी भागीदार यांच्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या निश्चित करणे.

१०.२. प्रकल्प उभारणीचा कालावधी, कार्यान्वन, संचालन व देखभाल याबाबतच्या स्पष्ट तरतूदी करणे. तथापि, करार कालावधी हा जास्तीत जास्त १५ वर्षासाठीचा असेल.

१०.३. प्रकल्प हस्तांतरण आणि करार रद्द करण्याबाबत स्पष्ट तरतूदी करणे.

१०.४. सहकारी साखर कारखान्यांना BOT/BOOT तत्वावरील प्रकल्प कारखान्यास आर्थिक सक्षमता प्राप्त झाल्यानंतर खरेदी करता येण्याची तरतूद करारामध्ये असणे आवश्यक आहे.

१०.५. कारखान्यास देय रकमांच्या बाबतीत निश्चित वेळापत्रक तयार करून त्यानुसार विकासकाने देय रकमा कारखान्याकडे वेळेत द्याव्यात अशी तरतूद करारात करण्यात यावी.

१०.६. जर काही नैसर्गिक किंवा आपत्कालीन परिस्थितीत कारखाना बंद राहून, कारखान्याकडून विकासकाला कच्च्या मालाचा पुरवठा होवू शकला नाही, तर BOT/BOOT प्रकल्पाच्या करार कालावधीमध्ये वाढ करण्याची तरतूद असावी.

१०.७. BOT/BOOT प्रकल्पाचा करार समाप्त झाल्यानंतर, सदरचा प्रकल्प साखर कारखान्याला हस्तांतरित /Slum sale (विक्री) करताना जी पण सरकारी देणी (stamp duty. etc.) येतील, ती सर्व देणी विकासकाने भरावयाची आहे. यासाठी विकासकाने साखर कारखान्यासोबत करार करताना सदर बाबींचा करारात उल्लेख करावा.

१०.८. प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली किंवा प्राप्त होणार असलेली शासनाची मदत, अनुदान आणि सवलती या साखर कारखान्यांना अथवा विकासकाला मिळेल याची स्पष्ट तरतूद करारामध्ये असणे आवश्यक असेल. तथापि, याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा असेल.

१०.९. करार करण्यापूर्वी कारखान्याकडे असलेल्या कर्जाकरिता अथवा देयकाबाबत करार कालावधीमध्ये विकासक कोणत्याही प्रकारच्या वसुलीस पात्र राहणार नाही.

१०.१०.सदर प्रकल्पाच्या सुरू होणे पूर्वी विकासकाच्या कोणतीही देणी व करार BOT/BOOT तत्त्वावरील प्रकल्पाला लागू होणार नाही.

१०.११. BOT/BOOT कालावधीत विकासकाच्या कोणत्याही कर्जाची अथवा तत्सम आर्थिक व कायदेशीर बाबींची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही.

१०.१२. विकासकाने कारखान्यास BOT/BOOT कालावधी संपल्यानंतर हस्तांतर करताना कोणतेही कर्ज अथवा देयक असता कामा नये, याची जबाबदारी विकासकाची राहील.

१०.१३. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना प्रॉव्हीडंट फंड, ग्रॅच्युटी, प्रॉफेशनल टॅक्स, इन्कम टॅक्स (TDS), अर्जित रजा (Leave encahsment) कामगार कल्याण निधी व विमा आणि कामगार कायद्यानुसार देय असलेली रक्कम विकासकाने कायद्याप्रमाणे अदा करावयाची आहे.

१०.१४. करार कालावधीत प्रकल्पात कोणत्याही कर्मचाऱ्याचा अपघात, निधन झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्च, नुकसान भरपाई इ. कामगार कायद्याप्रमाणे विकासकास द्यावी लागेल.

१०.१५. कारखान्याने करार कालावधीमध्ये विकासकाच्या कामात कोणत्याही प्रकारचा अडथळा अथवा हस्तक्षेप करावयाचा नाही.

१०.१६. करार कालावधीत काही फौजदारी किंवा दिवाणी स्वरूपाचे खटले अथवा देणी निर्माण झाल्यास त्यास विकासक पूर्णतः जबाबदार राहतील.

१०.१७. प्रकल्पाच्या संबंधित पर्यावरण व सुरक्षा पाळण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

१०.१८. प्रकल्प उभारणीसाठी परवानगी / मान्यता मिळाल्यानंतर आणि प्रकल्प कालावधीत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत वाद निवारण यंत्रणा, लवाद किंवा योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद / फिर्याद मागण्यासाठी करारामध्ये तरतूद असावी.

१०.१९. BOT/BOOT तत्वावरील अहवालात प्रकल्प उभारणी करण्याचा कालावधी, प्रकल्प कार्यान्वित ठेवणे, करार समाप्ती व हस्तांतरण याबाबत आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम यंत्रणेकडून निश्चित करून घेण्यात यावा आणि त्याबाबत स्पष्ट तरतूदी करारामध्ये करणे आवश्यक राहील.

१०.२०. सर्व आर्थिक व्यवहार व करार महाराष्ट्रात लागू असणाऱ्या कायद्याप्रमाणे पार पाडले जावेत.

१०.२१. कारखान्याकडील शासकीय कर्ज, भागभांडवल, थकहमी, थकहमी शुल्क, देय FRP यांच्याबाबत सविस्तर आढावा घेतला जावा. साखर कारखान्यांनी BOT/BOOT तत्वावरील प्रकल्पातून मिळणाऱ्या उत्पन्नातून शासकीय थकबाकी प्राधान्याने भरावी त्याबाबतचे हमीपत्र कारखान्यांनी साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावे.

**११. <u>करार समाप्ती :-</u>**

भारतीय करार कायदा १८७२ नुसार करार समाप्तीकरिता खालील घटक कारणीभूत ठरतात.

i. **संगनमताने करार रद्द:** विकासकाने आणि साखर कारखाना यांच्या संगनमताने सहकारी साखर कारखाने किंवा विकासक यांना संगनमताने करार रद्द करण्याचा अधिकार आहे. जर संगनमताने करार रद्द झाल्यास सर्व अधिकार हे सहकारी साखर कारखान्याकडे हस्तांतरित करावेत व प्रकल्पाचा ताबा हा सहकारी साखर कारखान्याकडे द्यावा.

ii. **कराराचा कालावधी पूर्ण झाल्याने:** सहकारी साखर कारखाना व विकासक यांच्यातील कराराचा कालवधी पूर्ण झाल्यावर सदर करार समाप्त होईल आणि विकासकाने सदर प्रकल्प सहकारी साखर कारखान्याकडे हस्तांतरित करावा.

iii. **विकासकाने सदर प्रकल्प अर्धवट सोडल्याने:** जर विकासकाने करार कालावधी पूर्ण न करता प्रकल्प अर्धवट सोडला तर करार संपुष्टात येईल आणि कराराच्या सुरूवातीला विकासकाने सहकारी साखर कारखान्याकडे ठेवलेले सिक्युरीटी डिपॉजीट हे सहकारी साखर कारखाना जप्त करेल. तसेच कारखान्याचे होणारे नुकसान (Liquidated Damages) विकासकाकडून वसूल करण्यात यावे.

iv. **विकासकाने प्रकल्प पूर्णत्वास न नेल्यास व कराराचे उल्लंघन केल्यास:** जर विकासकाने प्रकल्प उभारण्यास दिरंगाई केल्यास अथवा कराराचे उल्लंघन केले तर करार संपुष्टात येईल आणि त्यांच्याकडून खालील नुकसान भरपाई घेणे योग्य राहील.-

१) प्रकल्प पूर्ण न झाल्याने सहकारी साखर कारखान्याच्या महसूलात झालेली घट

२) उत्पादन, वीज व जागेचे भाडे यामुळे झालेले सहकारी साखर कारखान्याचे आर्थिक नुकसान

३) नवीन कंत्राटदार नेमण्याचा लागलेला आर्थिक अतिरिक्त खर्च

४) उपकरणे, कच्चा माल किंवा इतर मालमत्तेचे झालेले नुकसान

v. **विकासक दिवाळखोर झाल्याने:** जर विकासकाची आर्थिक स्थिती हालाखीची होवून त्याला सनदी लेखापालांनी दिवाळखोर घोषित केले तर करार संपुष्टात येईल.

vi. जर विकासकाने कराराचे उल्लंघन केले, करार कालावधी पूर्ण न करता प्रकल्प अर्धवट सोडला अथवा तो दिवाळखोर झाला तर त्या विकासकाचा काळ्या यादीत (Black List) समावेश करण्यात यावा, जेणेकरून भविष्यामध्ये इतर सहकारी साखर कारखान्यांना, इतर प्रकल्प उभारताना या विकासकाची नेमणूक टाळता येईल.

**१२. <u>प्रकल्पाची हस्तांतरण प्रक्रिया :-</u>**

सहकारी साखर कारखाना आणि विकासक यांच्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या BOT/BOOT प्रकल्पाचा शेवटचा आणि अंतिम टप्पा म्हणजे **"प्रकल्प हस्तांतरण",** यामध्ये ठरविलेल्या कालावधीनंतर विकासकाने सहकारी साखर कारखान्याला प्रकल्पाची मालमत्ता उपकरणे तंत्रज्ञान तसेच संचालन हक्क औपचारिक पध्दतीने परत देणे गरजेचे आहे. त्यासाठी करार समाप्ती झाल्यानंतर सदर प्रकल्प गुंतवणूकदाराकडून सहकारी साखर कारखान्याकडे हस्तांतरित करताना खालील मुद्दे ग्राह्य धरावे.

i. हस्तांतरित प्रकल्प हा कार्यक्षम स्थितीत असावा यासाठी विकासक पूर्णतः जबाबदार राहील.

ii. BOT/BOOT तत्वावरील उपपदार्थ उत्पादन प्रकल्पाचा कालावधी समाप्त होण्याच्या ०३ महिन्यापूर्वी विकासकाने संबंधित सहकारी साखर कारखान्याला पत्राद्वारे कळवावे.

iii. सहकारी साखर कारखान्याने त्यांच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सदर प्रकल्पाचा कालावधी समाप्त झाला असल्याने कारखान्याची आर्थिक सक्षमता तपासून तो प्रकल्प ताब्यात घ्यावयाचा की, त्या प्रकल्पाचा कालावधी वाढवावयाचा आहे याबबात ठराव करुन निर्णय घ्यावा.

iv. जर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सदर प्रकल्प ताब्यात घ्यावयाचा नसेल तर, विकासकाबरोबर कराराचा कालावधी वाढवावा.

v. सदर प्रकल्पाचा कालावधी वाढविण्यासाठी साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांची सहकारी साखर कारखान्याने पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

vi. जर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सदर प्रकल्प ताब्यात घ्यावयाचा ठराव पारित झाला तर त्या आर्थिक वर्षात BOT/BOOT तत्वावरील प्रकल्पाची किंमत (घसारा विचारात घेवून) निश्चित करणे आवश्यक आहे.

vii. प्रकल्प ताब्यात घेण्याबाबतचा ठराव, हस्तांतरणाचा करार, प्रकल्पातील मालेमत्तेची यादी ही साखर आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अवलोकनाकरिता सादर करून त्यांची मान्यता घ्यावी.

viii. हस्तांतरण करताना सदर प्रकल्प हा बँक कर्ज, कामगारांचे वेतन थकवाकी, पुरवठादारांचे देणे आणि शासकीय देणी मुक्त असावा.

ix. विकासकाने प्रकल्प हस्तांतरित करताना प्रकल्पाचे सर्व दस्तऐवज, करार, अभिलेखे, कोड्स, डिझाईन, रिपोर्टर्स इ. सहकारी साखर कारखान्यांना द्यावेत.

x. सदर प्रकल्प चालू असताना विकासकाने नेमणूक केलेल्या कुशल कामगार व अधिकाऱ्यांची सहकारी साखर कारखान्यांनी सदर प्रकल्प ताब्यात घेताना सहकारी साखर कारखान्यात समाविष्ट करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**१३. <u>प्रकल्पाच्या मान्यतेसाठी शासकीय समिती</u>**

- BOT/ BOOT तत्वावरील प्रकल्पाचे उदा. सहवीज निर्मिती, आसवणी, इथेनॉल, बायोसिएनजी, सीजीजी, हायड्रोजन, सौरउर्जा, हायब्रीड प्रकल्प किंवा साखर कारखान्यात निर्माण होणाऱ्या उपपदार्थावर प्रक्रिया किंवा गुणवत्ता वाढ करणारे इतर कोणतेही प्रकल्पाचे प्रकल्पनिहाय निकष, अटी व शर्ती साखर आयुक्त स्तरावरील समिती निश्चित करेल. तसेच सदर समिती किंमत रू. ५ कोटीपर्यंत गुंतवणूक (करांसह) असणाऱ्या प्रकल्पांना छाननी करून मान्यता देईल.साखर आयुक्त स्तरावरील सदर छाननी समिती संदर्भ क्र. ४ येथील पत्रानुसार राहिल.
- BOT/ BOOT तत्वावरील प्रकल्पाची किंमत रू. ५ कोटी पेक्षा जास्त रकमेची गुंतवणूक (करांसह) असलेल्या प्रकल्पाची छाननी साखर आयुक्त स्तरावरील समिती करून प्रस्ताव शासनास सादर करतील. या प्रकल्पासाठी शासन स्तरावरील संदर्भ क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती निर्णय घेईल.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२६११३५५०३६०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH PANDURANG SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.02.26 11:37:18 +05'30'

**( अं.पां.शिंगाडे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-१) /(लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य मुंबई.
९. प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा-२) /(लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य नागपूर.
१०.सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर), सर्व विभागीय कार्यालय.
११.अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२.अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई.
१३.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ मर्यादीत, नरीमन पॉईंट, मुंबई.
१४.वित्त विभाग ( व्यय-२/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३), मंत्रालय, मुंबई
१५.निवडनस्ती (कार्यासन ३स)